महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११५३

क्रमांक-उशिसं/बी.एड./२०१७/याद्या पडताळणी/सीईटीसेल/ १२७३ दिनांक: 30 JAN 2018

प्रति,

प्राचार्य,
केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी सर्व
शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

विषय : शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या पडताळणी बाबत . . .

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये आपल्या महाविद्यालयात बी. एड., एम. एड., बी.पी.एड., आणि एम.पी.एड. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या पडताळणीचे वेळी आढळून आलेल्या त्रुटींची पडताळणी संचालनालयामार्फत करण्यात आली होती. तद्नंतरदेखील काही महाविद्यालयांनी त्रुटींची पडताळणी करण्यासाठी अंतिम संधी उपलब्ध करुन देण्यासाठी संचालनालयास विनंती केली आहे. त्यानुषंगाने दिनांक ०५.०२.२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता डेक्कन कॉलेज, बंगला नं. १, येरवडा, पुणे येथे त्रुटींची पूर्तता करुन प्रवेश याद्या प्रमाणित करुन घेण्यासाठी अंतिम संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. याद्या पडताळणीचे वेळी ज्या त्रुटी काढण्यात आलेल्या होत्या, त्याबाबतचे मुळ व छायांकित दस्तऐवज तपासणीसाठी समितीस सादर करावेत. तसेच मुळ प्रमाणपत्राचा व छायाप्रतीचा सेट स्वतंत्र असावा.

३. दिनांक ०५.०२.२०१८ रोजी महाविद्यालयामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या त्रुटी पूर्तता करुन याद्या प्रमाणित करुन घेण्यात याव्यात. सदरहू कालावधीनंतर शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्यांची त्रुटी पुर्तता करुन दिली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी. यादी पडताळणी न झाल्यामुळे आपणाशी संबंधित विद्यापीठाकडून होणाऱ्या कार्यवाहीस संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.

30/1

(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

D:\Sandip\B.Ed & M.Ed\2017-18\Common.docx

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.

२. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.